




दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# सायं कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com








सोलापूर | RNI No. MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक ५६ वा | बुधवार दि. १६ सप्टेंबर २०२६ | पाने ४ | पोस्ट परवाना:- SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# सोलापूरवर दुष्काळाचे संकट, शेतकऱ्यांचा जीव टांगणीला !

## पाऊस नाही, पाणी नाही खरीप उत्पादन धोक्यात

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- जिल्ह्यात खरीप हंगाम २०२६ मध्ये पावसाचे असमान वितरण, ऑगस्टमधील अत्यल्प पर्जन्यमान आणि दीर्घकाळ पडलेला पावसाचा खंड यामुळे दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. जिल्ह्याचे सरासरी पर्जन्यमान ४८१ मिलिमीटर असताना प्रत्यक्षात केवळ १९७.९ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. त्यामुळे ११ सप्टेंबरपर्यंत सरासरीच्या तुलनेत पर्जन्यमानात ५३.५७ टक्के तूट नोंदली गेली आहे. पावसाचे स्वरूप अनियमित आणि खंडित राहिल्याने शेतीबरोबरच पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर होण्याची चिन्हे आहेत.

जिल्हा प्रशासनाच्या दुष्काळ परिस्थिती अहवालातून पावसाअभावी निर्माण झालेल्या परिस्थितीचे गांभीर्य स्पष्ट झाले आहे. जून आणि जुलैमध्ये सरासरीच्या तुलनेत सुमारे ८० टक्के पर्जन्यमान झाले असले, तरी ऑगस्ट महिन्यात पावसाने मोठी ओढ दिली. ऑगस्टमध्ये केवळ १०७.५० मिलिमीटर म्हणजे ३९.९० टक्के पाऊस झाला. त्यानंतरही पावसाची अपेक्षित हजेरी न लागल्याने खरीप पिकांना मोठा फटका बसला आहे.

अनेक मंडळांत ३५ ते ४२ दिवस पावसाचा खंड- जिल्ह्यातील बहुतांश तालुक्यांमध्ये ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात पावसाचा मोठा खंड पडला. करमाळा, माढा, माळिशरस आणि मोहोळ तालुक्यांतील अनेक मंडळांमध्ये तब्बल ३५ ते ४२ दिवस पाऊस झालेला नाही. दीर्घकाळ पाऊस न झाल्यामुळे जमिनीतील ओलावा कमी झाला असून, पिकांची वाढ खुंटली आहे. काही भागांत पिके सुकण्यास सुरुवात झाली असून, उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

उजनीत समाधानकारक साठा; लघु प्रकल्प मात्र आटले

जिल्ह्यातील प्रमुख प्रकल्पांमध्ये पाणीसाठ्याची स्थिती



मात्र सर्वत्र सारखी नाही. उजनी प्रकल्पात ९ सप्टेंबर रोजी एकूण ११७.१७ टीएमसी म्हणजेच ९९.८१ टक्के पाणीसाठा होता. मध्यम प्रकल्पांमध्ये एकरुख ३८.०२ टक्के, हिंगणी ८.४५ टक्के, जवळगाव १९.६० टक्के, मांगी १९.४७ टक्के, आष्टी ७१.९७ टक्के आणि बोरी ३.६६ टक्के साठा आहे. पिंपळगाव (ढा.) प्रकल्पाचा साठा उणे १२.८८ टक्के नोंदविण्यात आला आहे.

जिल्ह्यातील ५६ लघु प्रकल्पांमध्ये केवळ २.८८ टक्के, तर कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांमध्ये ५.७५ टक्के पाणीसाठा आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्यासह आगामी रब्बी हंगामासाठीही पाण्याचे नियोजन करण्याचे आव्हान प्रशासनासमोर उभे राहिले आहे.

माढ्यात पेरणी केवळ ५९.३ टक्के- पावसाची स्थिती प्रतिकूल असतानाही जिल्ह्यात खरीप पेरणी सरासरीपेक्षा अधिक झाली आहे. जिल्ह्याचे खरीप सरासरी क्षेत्र ३ लाख ३७ हजार ९६८ हेक्टर असून, प्रत्यक्षात ३ लाख ५६ हजार ९१८ हेक्टरवर म्हणजेच १०५ टक्के पेरणी झाली आहे. मात्र तालुकानिहाय परिस्थितीत मोठी तफावत आहे.

पंढरपूरमध्ये सरासरीच्या १६५.४ टक्के, उत्तर सोलापूरमध्ये १४८.७ टक्के, करमाळ्यात १३६.१ टक्के आणि मोहोळमध्ये १२८.६ टक्के पेरणी झाली आहे. याउलट माढा तालुक्यात केवळ ५९.३ टक्के पेरणी झाली आहे. त्यामुळे पेरणीचे क्षेत्र आणि प्रत्यक्ष उत्पादन यातील तफावत यंदा मोठी राहण्याची शक्यता आहे.

सोयाबीन, मका, तूर, बाजरीला फटका- जिल्ह्यात सोयाबीनचे १ लाख ३० हजार ३०४ हेक्टर, तर मक्याचे ८१ हजार ८८८ हेक्टर क्षेत्र आहे. पावसाच्या दीर्घ ताणामुळे या पिकांची वाढ खुंटली असून काही भागांत पिके सुकण्यास सुरुवात झाली आहे. त्यातच कीड व रोगांचा प्रादुर्भाव वाढल्याने उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. मुगाचे ३ हजार ९०४ हेक्टर आणि उडदाचे ३९ हजार ९६५ हेक्टर क्षेत्र काढणी अथवा पक्वतेच्या अवस्थेत आहे. मात्र फुलोरा आणि शेंगा भरण्याच्या कालावधीत पाऊस न झाल्याने उत्पादनावर प्रतिकूल परिणाम झाला आहे. तुरीचे ७४ हजार १७३ हेक्टर क्षेत्र असून पावसाअभावी तुरीची वाढ खुंटली आहे. बाजरीचे १७ हजार ६४ हेक्टर क्षेत्र असून अनेक ठिकाणी बाजरीची पिके सुकू लागली आहेत.

५७ गावांना ४३ टँकरचा आधार- पावसाअभावी जिल्ह्यातील पाणीटंचाईची परिस्थितीही गंभीर बनली आहे. जिल्ह्यातील १२ पैकी नऊ तालुक्यांतील ५७ गावे आणि २२५ वाड्यांना सध्या टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. एकूण ४३ टँकर सुरू आहेत. अक्कलकोट, बार्शी, करमाळा, माढा, मंगळवेढा, माळिशरस, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर आणि सांगोला या तालुक्यांचा त्यात समावेश आहे. पावसाची स्थिती आणखी लांबल्यास टंचाईग्रस्त गावांची संख्या वाढण्याची शक्यता आहे.

कांदा क्षेत्रात मोठी घट- पावसाच्या अनिश्चिततेचा परिणाम कांदा लागवडीवरही झाला आहे. कांदा पीक दृष्टिक्षेप २०२६-२७ नुसार जिल्ह्यातील ऐतिहासिक सरासरी कांदा क्षेत्र २८ हजार ५१९ हेक्टर आहे. २०२५-२६ मध्ये हे क्षेत्र ४० हजार ४२० हेक्टरपर्यंत पोहोचले होते. मात्र चालू २०२६-२७ हंगामात कांदा लागवड १८ हजार ८५८ हेक्टरवर आली असून, ती ऐतिहासिक सरासरीच्या केवळ ६६ टक्के आहे.

तालुकानिहाय पाहता दक्षिण सोलापूरमध्ये सर्वाधिक ६ हजार ५०४ हेक्टर कांदा लागवड झाली आहे. बार्शीत ८०४ हेक्टर, मोहोळमध्ये ३३२ हेक्टर, तर उत्तर सोलापूरमध्ये केवळ १५५ हेक्टर क्षेत्रावर कांदा लागवड झाली आहे.

उत्पादन घटण्याची भीती- एकीकडे जिल्ह्यात खरीप पेरणी सरासरीपेक्षा अधिक झाली असली, तरी पिकांच्या निर्णायक वाढीच्या टप्प्यात पाऊस न झाल्याने उत्पादनक्षमतेवर गंभीर

(पान २ वर)

# जरांगे पाटील मुंबईच्या दिशेने; 'मागण्या मान्य होईपर्यंत माघार नाही'

## 'मला मारण्याचे षडयंत्र रचले' फडणवीस सरकारवर गंभीर आरोप

अंतरवाली सराटी (कटूसत्य वृत्त):- मराठा आरक्षणाच्या मागणीवर ठाम असलेले उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाचा आज १८ वा दिवस असून, सरकारकडून मागण्या पूर्णपणे मान्य करून त्यांची अंमलबजावणी होईपर्यंत माघार घेणार नसल्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे. मुंबई पोलिसांनी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आंदोलनाला परवानगी नाकारली असतानाही जरांगे पाटील अंतरवाली सराटी येथून मुंबईच्या दिशेने रवाना झाले आहेत.

मुंबईतील आझाद मैदानावर पोहोचण्याचा निर्धार व्यक्त करत जरांगे पाटील यांनी सरकारला आक्रमक इशारा दिला आहे.



दरम्यान, त्यांच्या या भूमिकेमुळे मराठा आरक्षण आंदोलनाची पुढील दिशा काय असेल, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

'माझ्या समाजाच्या लेकरांपेक्षा मोठे काहीही नाही'- मुंबईकडे रवाना होण्यापूर्वी पत्रकारांशी संवाद साधताना जरांगे पाटील भावुक झाले. मात्र, त्याचवेळी त्यांनी सरकारविरोधात आक्रमक भूमिका कायम ठेवली. 'मी मरेन; पण सरकारला शरण जाणार नाही. माझ्यासाठी माझ्या मराठा समाजाच्या लेकरांपेक्षा दुसरे काहीही मोठे नाही,' असे त्यांनी सांगितले.

मराठा समाजाला सरकारने आजवर फसविल्याचा आरोप करत, आपल्या मागण्या पूर्ण होईपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. 'मी एकटा मुंबईला येत आहे. मला गोळ्या घालून मारण्याचे षडयंत्र रचले जात आहे,' असा गंभीर आरोपही त्यांनी केला. या आरोपांबाबत सरकार किंवा संबंधित यंत्रणेकडून अधिकृत स्पष्टीकरण समोर आलेले नाही.

'मराठा कार्यकर्त्यांनी शांतता आणि एकजूट राखावी'- राज्यातील मराठा कार्यकर्त्यांना आवाहन करताना जरांगे पाटील यांनी शांतता आणि एकजूट राखण्याचा संदेश दिला. 'मी एकटा मुंबईला जात आहे,' असे सांगत त्यांनी मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांनी मुंबईत दाखल होण्याऐवजी शांतता राखावी, असा सूचक संदेश दिला.

त्यामुळे मुंबईकडे होणाऱ्या त्यांच्या प्रवासादरम्यान कार्यकर्त्यांची गर्दी वाढू नये आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासनाकडून खबरदारी घेतली जात आहे.

आंदोलनाच्या परवानगीवरून पेच- गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुंबईत कोणत्याही आंदोलनाला परवानगी दिली जाणार नाही, अशी भूमिका मुंबई पोलिसांनी घेतली आहे. त्यामुळे जरांगे पाटील यांच्या मुंबईतील आंदोलनाच्या परवानगीचा प्रश्न निर्माण झाला



आहे. दुसरीकडे, लोकशाही व्यवस्थेत नागरिकांना आंदोलनाचा अधिकार असून, कोणाला मुंबईत येण्यापासून रोखणे योग्य नसल्याचे न्यायालयीन निरीक्षण नुकतेच समोर आले होते. याच पार्श्वभूमीचा आधार घेत जरांगे पाटील यांनी मुंबईकडे जाण्याचा निर्धार कायम ठेवला आहे.

सरकारच्या शिष्टाईला अद्याप यश नाही- अंतरवाली सराटी येथे सुरू असलेल्या उपोषणादरम्यान राज्य सरकारच्या शिष्टमंडळाने जरांगे पाटील यांची भेट घेऊन चर्चा केली होती. मात्र, या चर्चेतून अद्याप तोडगा निघालेला नाही. त्यामुळे त्यांनी मुंबईकडे कूच करण्याचा निर्णय घेतला आहे.

सध्या ते काही निवडक कार्यकर्त्यांसह मुंबईच्या दिशेने रवाना झाले असून, त्यांच्या प्रकृतीतही खालावल्याचे सांगण्यात येत आहे. दीर्घकाळ सुरू असलेल्या उपोषणाच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या आरोग्याबाबत चिंता व्यक्त होत आहे.

'एक तर मरायचं, नाहीतर आरक्षण घ्यायचं'- आपल्या समाजाची लेकरं सुखी करणे ही आपली जबाबदारी असल्याचे सांगत जरांगे पाटील यांनी आंदोलनातून माघार न घेण्याची

(पान २ वर)

# अमित शाह यांच्या वक्तव्यावरून मराठी एकीकरण समितीचा संताप

मुंबई (कटूसत्य वृत्त):- केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी महाराष्ट्र सारखे दुसरे बहुभाषिक रास्य संपूर्ण भारतात नाही असे



वक्तव्य केले होते. या वक्तव्याचे पडसाद आता महाराष्ट्रात उमटू लागलेले आहेत.

मनसे नंतर आता मराठी एकीकरण समितीने देखील अमित शहा यावं यांच्या वक्तव्याचा निषेध व्यक्त केला आहे. नवी मुंबई येथील सिडको प्रदर्शन केंद्रामध्ये हिंदी दिवस आणि हिंदी राजभाषा संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवारी या संमेलनात अमित शहा उपस्थित होते. शाह यांनी महाराष्ट्र हे बहुभाषिक राज्य असल्याचे वक्तव्य केला होतं. या वक्तव्यानंतर मराठी एकीकरण समितीकडून संताप व्यक्त होत आहे. शाह आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राच्या मराठी राज्यावर हळूहळू हिंदीचा शिरकाव करण्याचा प्रयत्न करीत आहेत, असा आरोप गोवर्धन देशमुख यांनी केला. उत्तर भारतातील अनेक ठिकाणी ज्या पद्धतीने स्थानिक भाषांचे अस्तित्व कमी झाले, त्याच धर्तीवर इतर राज्यांमधील मूळ भाषांचे अस्तित्व संपविण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा दावा त्यांनी केला. त्याची सुरुवात महाराष्ट्रापासून करण्याचा डाव असल्याचेही ते म्हणाले. महाराष्ट्रात हिंदीला सहभाषेचा दर्जा देण्याचा कुटील डाव असल्याचा आरोप करून, आसाम राज्याप्रमाणे हिंदीला मराठी राज्यात सहभाषा करुन घ्यायची आहे का, राज्यातील नागरिकांनी हा प्रकार वेळीच ओळखणे गरजेचे आहे, असे देशमुख यांनी सांगितले. अमित शाह यांनी महाराष्ट्राबाबत इतके मोठे वक्तव्य करूनही राज्यातील राजकीय पक्ष आणि नागरिक मूग गिळून गप्प का आहेत, असा सवालही देशमुख यांनी उपस्थित केला.

त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावरही टीका केली. फडणवीस यांनी यमाझी आई मराठी मात्र, इतर भाषा मावशीसारख्याय असा उल्लेख या संमेलनात केला होता. १५० वर्षे जुनी हिंदी हजारो वर्षे इतिहास अभिजात ओळख असलेल्या मराठीची बहीण कशी? एकभाषिक मराठी राज्याचे प्रमुख असणारे फडणवीस यांनी भाषेचे नाते जोडण्यापेक्षा राज्यातील शेतकरी गोर गरीब कामगार आणि विध्यार्थी यांचे प्रश्न मार्गी लावावेत. राज्यात राज्यभाषेचे ६६ वर्षांनंतर ही एकही भवन नाही याची चिंता वाटायला हवी, असे देशमुख म्हणाले.






# सोलापूरात गणपती मिरवणुकांतील डॉल्बी-डीजे हद्दपार; जनतेच्या उठावाला प्रशासनाची साथ

सोलापूर (गिरीजा सुरवसे):- मिरवणूक तीच:मिरवणुकीला झालेली तुडुंब गर्दी तीच:मिरवणुकीतला शिगेला पोहचलेला उत्साह सुद्धा तोच:मिरवणुकीचे रस्ते तेच आणि मिरवणुका काढणारे सोलापूरकर सुद्धा तेच:अर्थात सोलापूरतेच आणि सोलापुरातली मिरवणूकसुद्धा तीच:पण या मिरवणुकीत ना डॉल्बीचा दणदणाट ना डीजेचा कर्णकर्कश आवाज:ना धिंगाणा ना धुमाकूळ.

वाजली ती फक्त पारंपारिक वाद्ये; पावलं नाचली ती फक्त लेझीमच्या तालावर आणि हलगीच्या ठेक्यावर, मिरवणुकीत दिसला तो फक्त आणि फक्त सात्विक भक्तिभाव आणि निमर्ळ उत्साह.

हे चित्र आहे उत्सव प्रिय सोलापूर शहरातील बदलत्या



मिरवणुकांचे. मिरवणूक म्हणजे सोलापूर आणि सोलापूर म्हणजे मिरवणूक असे समीकरण असणाऱ्या सोलापुरात हा सकारात्मक बदल गेल्या काही वर्षापासून सातत्याने दिसून येत आहे. याला कारणीभूत ठरला तो इथल्या नागरिकांनी केलेला उठाव, त्यास प्रशासनाने दिलेली खंबीर साथ आणि पारंपारिक लेझीम खेळाकडे वळलेली उत्सव मंडळे. या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नामुळे सोलापूर शहरातून पहिल्यांदा डीजे आणि डॉल्बी हद्दपार झाली. हाच कित्ता गिरवत ग्रामीण मधील नागरिक आणि ग्रामीण प्रशासनाने डॉल्बी व डीजेला नो एंट्री म्हटले आणि संपूर्ण जिल्ह्यातील उत्सव हा उत्सवासारखा साजरा होऊ लागला.

सोलापूर हे उत्सवप्रिय शहर आहे. वर्षातील बाराही महिने सोलापुरात कोणता ना कोणता उत्सव साजरा होतच असतो आणि त्या त्या उत्सवाची सांगता भव्य दिव्य मिरवणुकीनेच होत असते. त्यामुळे मिरवणुकांचे शहर अशी सोलापूरची ओळख तयार झालेली आहे.

अशा मिरवणुकांच्या सोलापूर शहरांमध्ये केस तर केस १६ बेस असे म्हणत अनेक उत्सव मंडळेही डीजे आणि डॉल्बी लावून सोलापूरचे वातावरण दणाणून सोडत असत. कानठळ्या बसवणारा गोंगाट, हृदयाची धडकी भरवणारा डॉल्बी-डीजेचा दणदणाट, त्यातून होणारे प्रचंड ध्वनीप्रदूषण यामुळे सोलापूरकरांचे सोलापुरात राहणे कठीण झाले होते, उत्सव काळात सोलापुरातील काही रुग्णांना प्राणास मुकावे लागले होते.

## संपादकीय

# अर्थव्यवस्थेच्या वाढीतील विरोधाभास

कोणत्याही देशाची आर्थिक शक्ती ही तो देश दर वर्षी स्वतःच्या भौगोलिक सीमेमध्ये किती प्रमाणात अंतिम वस्तू व सेवांचे उत्पादन करतो, यावर ठरविली जाते. यालाच सकल देशांतर्गत उत्पादन, म्हणजेच 'ग्रॉस डोमेस्टिक प्रॉडक्ट' किंवा 'जीडीपी', असे म्हटले जाते. जीडीपीत दर वर्षी होणारी वाढ हे देशाच्या अर्थव्यवस्थेचे आरोग्य आणि विकास दर्शविणारे एक मुख्य मापक आहे.

३१ ऑगस्ट २०२६ रोजी भारताच्या सांख्यिकी मंत्रालयाने २०२६-२७ च्या पहिल्या तिमाहीसाठी जो जीडीपी डेटा प्रसिद्ध केला, त्यानुसार चालू वर्षाच्या पहिल्या तिमाहीत, गेल्या वर्षीच्या पहिल्या तिमाहीच्या तुलनेत, भारताच्या वास्तविक जीडीपीत ७.८ टक्के एवढी वाढ झाली. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या ७.० टक्के या अंदाजापेक्षा, तसेच बाजार-विश्लेषकांच्या ६.९ टक्के ते ७.१ टक्के या अंदाजापेक्षा प्रत्यक्षातील वाढ कितीतरी अधिक नोंदविली गेली.

खरे तर पहिल्या तिमाहीत भारतीय अर्थव्यवस्थेपुढे कितीतरी गंभीर आव्हाने होती. पश्चिम आशियाई भागातील ताणतणाव, भडकलेल्या कच्च्या तेलाच्या किमती, पुरवठा-साखळीत निर्माण झालेले अडथळे, आंतरराष्ट्रीय व्यापारातील वाढती अनिश्चितता व त्याचा निर्यातीवर होऊ शकणारा विपरीत परिणाम, यावर्षीचा विलंबित पावसाळा व नंतर पडलेल्या पावसाचे विषम वितरण अशा अनेक समस्या होत्या.

या समस्यांचा विचार करून, तसेच 'उच्च वारंवारता निर्देशांकां'नी पहिल्या तिमाहीचे जे चित्र दाखविले होते ते लक्षात घेऊन जसे की खालावलेले उत्खनन, मंदावलेली वीज-निर्मिती, जीएसटी ई-वे बिल्समधील घट, आंतरराष्ट्रीय व्यापारातील वाढलेली तूट, रुपयाचे अवमूल्यन इत्यादी रिझर्व्ह बँकेने तसेच बाजार-विश्लेषकांनी पहिल्या तिमाहीतील आर्थिक वाढीविषयी सावधपणे अंदाज केले होते. त्यामुळेच पहिल्या तिमाहीसाठीच्या डेटामधून जेव्हा सणसणीत वाढलेला जीडीपी दिसून आला, तेव्हा अनेकांच्या भुवया उंचावल्या गेल्या. अनेकांनी संशयाची सुई रोखायला सुरुवात केली.

त्यात २०२६ या वर्षाच्या सुरुवातीलाच भारताने जीडीपी मोजण्याच्या पद्धतीत काही ठोस बदल केले आहेत; जसे की २०११-१२ या वर्षाऐवजी २०२२-२३ हे वर्ष आता आधारवर्ष म्हणून वापरण्यास सुरुवात केली आहे. तसेच या नवीन प्रणालीत किंमत-बदलातील जुळवणी स्वतंत्रपणे उत्पादनाच्या मूल्यासाठी आणि कच्च्या मालाच्या खर्चासाठी केली गेली आहे. त्यासाठी नव्याने बनविण्यात आलेला 'उत्पादक किंमत निर्देशांक' वापरण्यात आला आहे, ज्यात अधिक मोठ्या संख्येने घटक उत्पादने समाविष्ट केली गेली आहेत.

मात्र यापूर्वी जेव्हा केव्हा सरकारने जीडीपी मापनाची प्रणाली बदलली होती, तेव्हा त्यासोबत संपूर्ण 'स्त्रोत आणि पद्धती' दस्तऐवज प्रसिद्ध केला होता; पण यावेळी तसे केलेले नाही. त्यामुळे जीडीपी मापनात केलेल्या सुधारणांचे बारकावे अभ्यासकांना समजून घेता आले नाहीत.

यामुळे प्रणब सेन यांच्यासारखे तज्ज्ञदेखील, जे भारताचे पहिले प्रमुख सांख्यिकी अधिकारी होते, नाराज झाले आहेत. त्यांच्या मते, दोन दशकांहून अधिक काळ भारतातील सांख्यिकी तज्ज्ञांनी 'उत्पादक किंमत निर्देशांक' बनविण्यासाठी खर्च केला होता; पण उत्पादकांकडून कधीच हवा असलेला उत्पादक-किमतींचा डेटा मिळाला नव्हता. कारण ते उत्पादकांचे एक प्रकारे 'ट्रेड सीक्रेट' असते. तसेच उत्पादक उत्पादित वस्तू निरनिराळ्या वितरकांना निरनिराळ्या किमतींना विकत असतात.

त्यामुळे त्या किमतींची सरासरी मिळणे गरजेचे असते. सेन यांच्या मते, ही सर्व माहिती कशी गोळा केली गेली आहे, यावर सरकारने प्रकाश टाकणे गरजेचे आहे. एकाएकी उत्पादक सहकार्य कसे करू लागले, असा प्रश्न ते उपस्थित करतात. तसेच जुने व नवे उत्पादक किंमत-विषयक निर्देशांक काही वर्षांसाठी एकत्रितपणे प्रकाशित केले पाहिजेत, जेणेकरून अभ्यासकांना त्यांच्यातील नेमका फरक समजून घेता येईल. कच्च्या मालासंबंधीची सांख्यिकीही प्रसिद्ध करण्यात आलेली नाही. कच्च्या मालासंबंधीचा डेटा वापरता येण्यासाठी संपूर्ण अर्थव्यवस्थेसाठी 'पुरवठा व वापर तक्ता' उपलब्ध असणे गरजेचे असते. गेल्या काही वर्षांत हे कामदेखील थांबविण्यात आले आहे. असे अनेक महत्त्वाचे मुद्दे भारताचे पहिले प्रमुख सांख्यिकी अधिकारी प्रणब सेन यांनी मांडले आहेत.

भारताचे भूतपूर्व प्रमुख सरकारी अर्थतज्ज्ञ अरविंद सुब्रमण्यन यांनी हा प्रश्न 'विश्वासाच्या कमतरते'चा असल्याचे प्रतिपादन केले आहे. अनेक वर्षे जनगणना न होणे, अचानकपणे 'उपभोगासंबंधित सर्वेक्षण' मागे घेण्यात येणे, कोविड तसेच नोटाबंदीच्या काळातील आर्थिक परिस्थितीचे योग्य प्रकारे मूल्यमापन न होणे, विशेषतः अनौपचारिक क्षेत्रासाठी, अशी अनेक कारणे या 'विश्वासाच्या कमतरते'मागे असल्याचे ते अधोरेखित करतात.

आता नव्या पद्धतीने मोजण्यात आलेल्या प्रत्यक्ष जीडीपी सांख्यिकीकडे बघू. नव्या आधारवर्षाच्या संदर्भात, गेल्या वर्षीच्या तुलनेत भारताचा पहिल्या तिमाहीतील वास्तविक जीडीपी निश्चितच ७.८ टक्क्यांनी वाढलेला आहे. पहिल्या तिमाहीतील एकूण आर्थिक वाढ समाधानकारक होती, हे काही उच्च वारंवारता निर्देशांकांमधूनही दिसून आले आहे. उदाहरणार्थ, एकूण निर्यातीमधील वाढ- १६.१ टक्के वार्षिक वाढ; बँकांच्या क्रेडिटमधील वाढ- १८.१ टक्के वार्षिक वाढ; स्वयंचलित वाहनांच्या विक्रीतील वाढ- २५.९ टक्के वार्षिक वाढ; टिकाऊ उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनातील वाढ- सुमारे ८.० टक्के वार्षिक वाढ इत्यादी. यातून एवढे तरी निश्चितपणे म्हणता येते की भारतीय अर्थव्यवस्थेतील काही क्षेत्रांची वाढ समाधानकारकपणे होत आहे आणि पहिल्या तिमाहीतील आर्थिक आव्हाने लक्षात घेता या क्षेत्रांची लवचिकता निश्चितपणे सुधारलेली आहे.

मग इतकी अस्वस्थता कशामुळे आहे? तर जीडीपी मापनाच्या नवीन पद्धतीमुळे गेल्या वर्षातील, म्हणजेच २०२५-२६ या वर्षातील पहिल्या तिमाहीचे जीडीपी, चालू किमतींत, ८६.०५ लाख कोटी रुपयांपासून ८०.०० लाख कोटी रुपयांपर्यंत, म्हणजेच ७.६ टक्क्यांनी, घसरले आहे. आता जेव्हा जेव्हा जीडीपी मापनाची प्रणाली बदलते, तेव्हा तेव्हा आधीच्या वर्षांतील जीडीपीचे आकारमान कमी झालेले दिसते. पण यावेळीची घट लक्षणीय प्रमाणात असल्यामुळे, आधीच्या वर्षांतील जीडीपी प्रत्यक्षापेक्षा कितीतरी अधिक दाखविले गेले होते, हा अभ्यासकांचा दावा खरा ठरला आहे. भारतात अजूनही अनौपचारिक क्षेत्रातून निर्माण होणाऱ्या जीडीपीचे अचूकपणे मापन होत नाही, हे पुन्हा पुन्हा दिसून आले आहे.

# पावसा, शेतकऱ्यांचे अश्रू कधी पुसणार?

पडला तर दुष्काळ, अन पडला तर महापूर... निसर्गाच्या याच लहरीपणाच्या चक्रात आज महाराष्ट्राचा बळीराजा अडकला आहे. ज्या पावसाची चातकासारखी वाट पाहून शेतकरी डोळ्यात प्राण आणून आकाशाकडे पाहत असतो, तोच पाऊस कधीकधी त्याच्या डोळ्यांत अखंड अश्रू देऊन जातो. म्हणूनच आज प्रत्येक संवेदनशील मनाला एकच प्रश्न पडतोय-पावसा, तू शेतकऱ्यांचे अश्रू कधी पुसणार?

भारत हा कृषिप्रधान देश आहे आणि शेती हा आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. पण दुर्दैवाने, या कण्याला बळ देणारा शेतकरी आज स्वतः अत्यंत हलाखीचे जीवन जगत आहे. पावसाचे आणि शेतकऱ्यांचे नाते हे अत्यंत भावनिक आणि जिव्हाळ्याचे आहे. पाऊस आला की काळ्या आईच्या कुशीत हिरवे कोंब हसू लागतात. पण गेल्या काही वर्षांत हे नाते बदलले आहे. जागतिक तापमानवाढ आणि हवामान बदलामुळे पावसाचे गणित पार बिघडून गेले आहे.

कधी जून-जुलै महिना संपत आला तरी पावसाचा पत्ता नसतो. आणि यंदा तर सप्टेंबर महिना संपत आला तरी पावसाचा पत्ता नाही. पावसाअभावी पेरण्या उलटून जातात, कोवळी पिके करपून जातात. पाण्यासाठी आणि चाऱ्यासाठी जनावरे तडफडतात. आणि जेव्हा पाऊस येतो, तेव्हा तो इतका अक्राळविक्राळ रूप धारण करतो की, अतिवृष्टी आणि महापुराने उभ्या पिकांचे वाटोळे होते. हातातोंडाशी आलेला घास एका रात्रीत वाहून जातो. निसर्गाच्या



या दुहेरी मारामुळे शेतकरी पुरता कोलमडून गेला आहे.

शेतकरी शेतात फक्त घाम गाळत नाही, तर आपली स्वप्ने पेरत असतो. बँकेचे कर्ज, सावकाराचे देणे, बियाणे आणि खतांचा खर्च या सगळ्याचा ताळमेळ बसवताना त्याची दमछाक होते. पीक चांगले येईल आणि पोराबाळांचे शिक्षण, मुलीचे लग्न, घराची डागडुजी करता येईल, या आशेवर तो जगत असतो. पण जेव्हा निसर्ग लहरी बनतो, तेव्हा त्याच्या सर्व आशांवर पाणी फेरले जाते. कर्जाचा डोंगर आणि पिकांचे झालेले नुकसान यामुळे हताश होऊन अनेक शेतकरी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलतात. ही आपल्या समाजासाठी अत्यंत भूषणावह आणि वेदनादायी गोष्ट आहे.

पावसाने केवळ पाणी देणे पुरेसे नाही, तर त्याने वेळेवर आणि योग्य प्रमाणात येणे गरजेचे आहे. पण पाऊस तर निर्जीव आहे, तो मानवाच्या हातात नाही. मग शेतकऱ्यांचे अश्रू पुसणार कोण? केवळ निसर्गाला दोष देऊन चालणार नाही. यासाठी शासनाने आणि समाजानेही पुढे येण्याची गरज आहे. शेतकऱ्यांना योग्य नुकसानभरपाई मिळणे, कर्जमाफी शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देणे, पीक विम्याची प्रक्रिया सुलभ करणे आणि सिंचनाच्या सोयी उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. तसेच वृक्ष लागवड मोठ्या प्रमाणात केली पाहिजे.

सगळ्या जगाचा पोशिंदा असणारा शेतकरी आज स्वतः उपाशी राहण्याची वेळ आली आहे. जोपर्यंत हवामान बदलावर ठोस उपाययोजना होत नाहीत आणि शेतकऱ्याला त्याच्या घामाचे योग्य मूल्य मिळत नाही, तोपर्यंत त्याचे अश्रू पुसले जाणार नाहीत.

हे पावसा, तू निसर्गाचा नियम पाळ, पण थोडी दयाही दाखव. शेतकऱ्याच्या कष्टाचा आदर कर. यंदा तरी असा बरस की त्याच्या शेतात सोन्याचे पीक डोलेल आणि त्याच्या डोळ्यांतील अश्रू पुसले जाऊन तिथे आनंदाचे हास्य फुलेल!

**– बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे खंडाळी**
**ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

# असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनिअर सोलापूर यांचा इंजिनिअर्स डे कार्यक्रम संपन्न

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- विद्यार्थी आपल्या कामात जेव्हा यशस्वी होतो तेव्हा शिक्षकाला मनस्वी आनंद होतो. तसेच आपला एक साथीदार कामांमध्ये उत्कृष्टरित्या कामात यशस्वी होत असेल तर त्याचे कौतुक करणे आपले कर्तव्य असल्याचे मत डॉ. प्राचार्य जमील दफेदार यांनी व्यक्त केले.

हेरिटेज लॉन येथे संपन्न झालेल्या कार्यक्रमात ते पुढे बोलताना म्हणाले की शिस्त, ज्ञान आणि राष्ट्रनिर्माणाचे संदेश देणाऱ्या सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांचा



आदर्श घेऊन सर्व इंजिनियर्सनी देशाच्या विकासात आपला सहभाग नोंदवावा असे त्यांनी आवर्जून सांगितले. आणि गुणवंत अभियंता म्हणून सन्मान केलेल्या माहेश्वरी कन्स्ट्रक्शन कंपनीचे प्रमुख नंदकिशोर मुंदडा तसेच यावेळी असोसिएशनच्या गुणवंत पाल्यांचा देखील सुनील फुरडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच डॉ. प्राचार्या शुभदा उपासे यांचा सत्कार सौ. सुनीता जाधव यांच्या हस्ते करण्यात आला. इंजिनिअर्स डे चे औचित्य साधून ए. आय.या वर डॉक्टर प्रा. प्रदीप तपकिरे यांचे प्रेझेंटेशन व मार्गदर्शन झाले. याचा वापर करून आपण वेळेची बचत करू शकतो आणि उत्तम - उत्तम स्ट्रक्चर निर्माण करू शकतो असे मत त्यांनी मांडले. अल्ट्राटेक चे विजय चव्हाण यांनी गुड प्रॅक्टिस इन कन्स्ट्रक्शन इंडस्ट्री संदर्भातली माहिती उपस्थितांना दिली.

इंजिनीअर्स डे चे औचित्य साधून ५० अभियंत्यांनी रक्तदान केले. कार्यक्रमाची प्रस्तावना असोसिएशनचे अध्यक्ष बी.एम. जाधव यांनी केले. तर आभार सचिव संतोषकुमार बायस यांनी मानले. सूत्रसंचालन नर्मदा कनकी यांनी मानले. पाहुण्यांचा परिचय इंजि. वैभव होमकर, इंजि. मनोज महिंद्रकर, इंजि. गणेश इंदापुरे, इंजि. प्रशांत मोरे यांनी करून दिला. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी इंजि. इफ्तेकर नदाफ, इंजि. गणेश अन्नलदास, इंजी. सुनील दुधगुंडी, इंजी. मनोहर लोमटे, इंजी. प्रवीण हेडगिरे, इंजी. जवाहर उपासे, इंजी. हनुमंतप्रसाद गज्जम, इंजी. दत्तात्रय घोडके, इंजी. नितीन पवार, इंजी. हरी चव्हाण व असोसिएशन च्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

या वेळी माजी अध्यक्ष इंजि.मनोज म्हेत्रस,इंजि.इंजी. इंजि.नामदेव म्हेत्रस,इंजि.अजय पाटील इंजि. प्रकाश तोरवी, इंजि.अमोल मेहता या सह असोसिएशन चे बहुसंख्य इंजिनिअर उपस्थित होते.

# माढ्यातील कर्मयोगी आ. बबनदादा शिंदे नेत्रालयात गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना

माढा (कटूसत्य वृत्त):-माढा येथील संकल्प फाऊंडेशन संचलित, नामांकित कर्मयोगी आमदार बबनदादा शिंदे नेत्रालयाच्या नूतन सुसज्ज व अद्ययावत इमारतीत प्रथमच गणपती बाप्पाच्या आगमनानिमित्त सोमवारी १४ सप्टेंबर २०२६ रोजी मोठ्या भक्तिभावाने आनंदोत्सव साजरा करण्यात आला. माढेश्वरी अर्बन बँकेचे चेअरमन माजी आमदार बबनराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नेत्रालयात प्रथमच गणपतीची प्राणप्रतिष्ठापना संकल्प फाऊंडेशनचे अध्यक्ष अशोक लुणावत व विठ्ठलवाडीचे आदर्श शिक्षक राजेंद्र गुंड यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी नेत्रालयाच्या प्रांगणात बाप्पाच्या आगमनामुळे भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते. यावेळी पुरोहित बापू कुंभेजकर यांनी विधिवत



मंत्रोच्चार आणि पूजेच्या विधीनंतर गणपती बाप्पाची मूर्ती वेदीवर विराजमान करण्यात आली.पहिल्याच वर्षी नूतन वास्तूत सुरू झालेल्या या धार्मिक व सांस्कृतिक उपक्रमामुळे शहर व परिसरातील नागरिक, नेत्रालयातील कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

यावेळी संकल्प फाऊंडेशनचे अध्यक्ष व्हा.चेअरमन अशोक लुणावत यांनी गणपती बाप्पाकडे 'भरपूर पाऊस पडू दे अन् दुष्काळ हटून सर्वांना सुख समृद्धीचे दिवस येऊ दे' म्हणून गणपती बाप्पाकडे साकडे घातले.नेत्र रुग्णांची सेवा करणाऱ्या या आरोग्य मंदिरात बाप्पाचे आगमन झाल्यामुळे वातावरण अधिक प्रसन्न व मंगलमय झाले असून बाप्पाच्या कृपेने येथे येणाऱ्या प्रत्येक रुग्णाला निरोगी दीर्घायुष्य लाभावे अशी प्रार्थना केली. यावेळी पुरोहित बापू कुंभेजकर,वरिष्ठ अधिकारी निलेश कुलकर्णी,आदर्श शिक्षक राजेंद्र गुंड,

समाधान भांगे,अक्षय कवटे,सुरेश कुबेर,प्रीती घळके,सुमन पाटोळे,छबुबाई पाटोळे, ज्योतीराम घळके,जयश्री शिंदे,वृंदावनी भांगे यांच्यासह ग्रामस्थ व भाविक भक्त उपस्थित होते.

**✻ पान १ वरुन ✻**

**✻ सोलापूरवर दुष्काळाचे संकट.....**

परिणाम होण्याची शक्यता आहे. दीर्घ पावसाचा खंड, जमिनीतील घटलेला ओलावा, वाढता कीड-रोग प्रादुर्भाव आणि पाणीटंचाई यामुळे शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे.

पावसाची तूट, पावसातील असमानता आणि पिकांची सद्यस्थिती लक्षात घेता प्रशासनाने टंचाईग्रस्त भागांचे बारकाईने सर्वेक्षण करून पीक नुकसानीचे वस्तुनिष्ठ मूल्यांकन करणे, पिण्याच्या पाण्याचे नियोजन करणे आणि शेतकऱ्यांना आवश्यक त्या मदतीचे तातडीने नियोजन करणे गरजेचे बनले आहे.

**✻ जरांगे पाटील मुंबईच्या दिशेने.....**

भूमिका पुन्हा स्पष्ट केली. 'एक तर मरायचं, नाहीतर आरक्षण तरी घ्यायचं,' असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

'सरकारने मला मारण्याचे षडयंत्र रचले आहे,' असा आरोप करत आझाद मैदानावर आपल्यावर गोळ्या झाडल्या तरी आपण मागे हटणार नसल्याचा इशाराही त्यांनी दिला. या आरोपांमुळे आंदोलनाला आता अधिक आक्रमक वळण मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

जरांगेंच्या सुरक्षेत वाढ- दरम्यान, जरांगे पाटील यांच्या मुंबई दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारकडून त्यांच्या सुरक्षेत वाढ करण्यात आली असून, त्यांना एसपीयू सुरक्षा पुरविण्यात आली आहे. आंदोलनामुळे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासनाकडून परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे.

एका बाजूला मुंबई पोलिसांकडून आंदोलनाला परवानगी नाकारण्यात आली आहे, तर दुसऱ्या बाजूला मुंबई गाठण्यावर जरांगे पाटील ठाम आहेत. त्यामुळे पुढील काही दिवसांत मराठा आरक्षण आंदोलन आणि सरकार यांच्यातील संघर्ष अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. जरांगे पाटील मुंबईत पोहोचल्यानंतर प्रशासन त्यांना कोणती भूमिका घेण्यास सांगते आणि त्यावर आंदोलनाची पुढील दिशा काय ठरते, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

## वात्रटिका

**आमची तक्रार**

वारी गेली, पोळा गेला
गणपतीही कोरडा आला...
लक्ष्मीची आशा लागली
पण भरोसा नाही उरला...
गणपतीने आमची तक्रार
तिथे पोहचवली पाहिजे...
वरूणराजाने कारभारात
सुधारणा केली पाहिजे...

**हणमंत पडवळ, धाराशिव**
८६९८०६७५६६

# करमाळ्यात युनिटी ऑफ मूलनिवासी समाजाचे तिसरे राज्य अधिवेशन उत्साहात संपन्न




करमाळा (कटूसत्य वृत्त):- युनिटी ऑफ मूलनिवासी समाज या सामाजिक संघटनेचे महाराष्ट्राचे तिसरे राज्य अधिवेशन रविवारी (१३ सप्टेंबर) करमाळा येथील नालबंद मंगल कार्यालयात उत्साहात संपन्न झाले. राष्ट्रपिता ज्योतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षाच्या पार्श्वभूमीवर, आरक्षण दिनाच्या शतकोत्तर रजत जयंती वर्षानिमित्त तसेच महाड मुक्ती रणसंग्रामाच्या शताब्दी वर्षानिमित्त आयोजित करण्यात आलेले हे अधिवेशन प्रा. हरी नरके आणि डॉ. गेल ऑमव्हेट यांच्या स्मृतींना समर्पित करण्यात आले.

अधिवेशनाचे उद्घाटक म्हणून विद्रोही कवी वामनदादा कर्डक यांचे नातू संदेश संभाजी कर्डक उपस्थित होते. तर मुख्य अतिथी म्हणून इंडियन मेडिकल प्रोफेशनल असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. राजेश कुमार, बहुजन सत्यशोधक संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष सुनील ओहोळ, युनिटी ऑफ मूलनिवासी समाजचे राष्ट्रीय उपाध्यक्ष राजेंद्र करंदीकर, रिपाईचे पश्चिम महाराष्ट्र संघटक नागेश कांबळे, सामाजिक कार्यकर्ते उस्मान शेठ तांबोळी, वरिष्ठ सामाजिक कार्यकर्ते सोपान सखाराम ढाणे, सामाजिक विचारवंत पैगंबर शेख, युनिटी ऑफ मूलनिवासी समाज संघाचे प्रदेशाध्यक्ष अजित खरसडे, लाँग मार्च, बीडचे संयोजक अजय सरवदे व सिद्धार्थ शिनगारे तसेच राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष सुरेश पाटील उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी युनिटी ऑफ मूलनिवासी समाज संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष कमलाकांत काळे होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला राष्ट्र शिवशाहीर राजेंद्र कडूसकर यांनी प्रबोधनपर पोवाडा सादर करून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

अधिवेशनात उपस्थित प्रमुख मान्यवरांनी विविध सामाजिक, शैक्षणिक, घटनात्मक व नागरिकत्वाच्या प्रश्नांवर आपली मनोगते व्यक्त केली. जाती जनगणना, बहुजन प्रतिनिधित्व, आरक्षणाचे उपवर्गीकरण, शिक्षण व्यवस्था, नागरिकत्व आणि सामाजिक न्याय यांसह विविध विषयांवर अधिवेशनात विचारमंथन करण्यात आले.

अध्यक्षीय भाषणात कमलाकांत काळे यांनी 'जाती जनगणनेसोबत धोकेबाजी आणि बहुजन प्रतिनिधित्वावर वाढते घटनात्मक संकट' या विषयाचे विश्लेषण केले. आगामी जाती जनगणनेची अवस्था २०११ च्या डएउउ प्रमाणेच होणार आहे का, तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या आरक्षणाच्या उपवर्गीकरणासंदर्भातील निकालाची संविधानिकता व वैधता याबाबत त्यांनी आपले विचार मांडले. दुसऱ्या सत्रात SIR, NPR, NRC आणि CAA, नागरिकत्वाचा प्रश्न, मूलनिवासी समाजासमोरील संभाव्य आव्हाने, तसेच NEP, NEET-CET, TET परीक्षा व मूल्यांकन पद्धतीतील त्रुटी, उच्च शिक्षणाचे बाजारीकरण आणि पेपर लीकच्या घटनांमुळे निर्माण होणारी आव्हाने या विषयांवरही चर्चा करण्यात आली. राष्ट्राच्या पुनर्निर्माणात विद्यार्थी, तरुण आणि महिलांचा सहभाग, संघटनात्मक नैतिकता आणि सामाजिक परिवर्तनाच्या विविध पैलूंवरही अधिवेशनातून विचार मांडण्यात आले. विविध मान्यवरांच्या उपस्थितीत झालेल्या या राज्य अधिवेशनाला समाजातील कार्यकर्ते, विद्यार्थी, तरुण, महिला आणि विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# राष्ट्रीय पशुधन अभियान योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- जिल्हा परिषद सोलापूरच्या पशुसंवर्धन विभागांतर्गत पशुसंवर्धन व दुग्धशाळा समितीची मासिक सभा आज, दिनांक ९ सप्टेंबर २०२६ रोजी संपन्न झाली. कृषी व पशुसंवर्धन समितीचे सभापती मा. रामप्पा चंद्रशेखर चिवडशेट्टी यांच्या अध्यक्षतेखाली या सभेचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीमध्ये जिल्ह्यातील पशुसंवर्धन विभागामार्फत राबवल्या जाणाऱ्या विविध वैयक्तिक लाभाच्या योजना, विभागांतर्गत सुरू असलेली बांधकामे, तसेच सोलापूर जिल्ह्यातील एकूण दूध संकलनाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. 'पशुधन विमा योजने'चा लाभ घेण्याचे आवाहन

केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय पशुधन अभियाना अंतर्गत राज्यात पशुधन विमा योजना राबवली जात आहे. या योजनेसाठीचे अर्ज लवकरच उपलब्ध होणार असून, जिल्ह्यातील पशुपालकांनी अधिक माहिती व अर्जासाठी आपल्या जवळच्या पशुवैद्यकीय दवाखान्याशी अथवा पंचायत समितीच्या तालुका पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन या वेळी करण्यात आले.

सदर बैठकीस कृषी व पशुसंवर्धन समितीचे सभापती मा. रामप्पा चंद्रशेखर चिवडशेट्टी, समितीचे सर्व सन्माननीय विषय समिती सदस्य, सोलापूर जिल्हा उपायुक्त मा. डॉ. व्ही. डी. येवले, सर्व पंचायत समित्यांचे तालुका पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय अधिकारी, कार्यकारी अभियंता (बांधकाम १ व २) यांचे प्रतिनिधी आणि जिल्हा दुग्धव्यवसाय अधिकारी (सोलापूर) यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, **संपादकःश्री.पांडूरंग हरिदास सुरवसे** यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-३, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर-४१३००३ येथे छापून येथूनच प्रसिध्द केले. कार्यालयः- एफ-३, वृंदावन पार्क, होटगी रोड सोलापूर-४१३००३
फोन/ फॅक्स(०२१७)२६०५०९१ **RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो.(९७६५३९०३३९) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो.(९६५७०६९०६९) कायदा सल्लागारः ॲड.खतीब वकील.**
It is owned by Shri Pandurang Haridas Survase, Editor, Publisher, Sanskruti Printing Press F-3, Vrundavan Park, Hotgi Road, Solapur 413003. Printed here F-3 Vrundavan Park Hotagi Road Solapur 413003 Published from Office - F-3 Vrindavan Park Hotgi Road Solapur 413003 Phone-0217-2605091 Editor Pandurang Suravase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No .MAHMAR 2006/17624**

# बोरामणी येथे जिल्हाधिकारी व आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी केली प्रत्यक्ष पाहणी

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- पावसातील दीर्घ खंड तसेच कमी पावसामुळे जिल्ह्यातील काही भागात दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष अडचणी जाणून घेण्यासाठी जिल्हा प्रशासनाने शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन परिस्थितीचा आढावा घेतला. बोरामणी येथे जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन व आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या उपस्थितीत दुष्काळसदृश्य परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. बोरामणीसह दक्षिण सोलापूर तालुक्यातील काही गावे तसेच अक्कलकोट तालुक्यातील गावांना भेटी देऊन प्रशासनाने पावसाची स्थिती आणि पिकांवरील परिणामाची माहिती घेतली. यावेळी शेतकऱ्यांशी थेट संवाद साधून पावसातील खंड, जमिनीतील ओलावा, पिकांची सद्यस्थिती, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता तसेच जनावरांसाठी चाऱ्याची परिस्थिती याबाबत सविस्तर माहिती जाणून घेण्यात आली.



जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी शेतात जाऊन सोयाबीन, ऊस आणि मका या पिकांची प्रत्यक्ष पाहणी केली. अनियमित पावसामुळे पिकांची झालेली वाढ, जमिनीतील ओलाव्याची पातळी आणि आगामी काळात निर्माण होऊ शकणाऱ्या अडचणींबाबत शेतकऱ्यांकडून माहिती घेण्यात आली. पावसाने आणखी ओढ दिल्यास खरीप पिकांसह पुढील हंगामावरही त्याचा परिणाम होण्याची शक्यता शेतकऱ्यांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिली. पात्र शेतकऱ्यांना मदतीसाठी प्रशासन प्रयत्नशील शेतकऱ्यांच्या अडचणींची वस्तुनिष्ठ माहिती प्रशासनापर्यंत पोहोचवून शासनाच्या निर्णयानुसार पात्र शेतकऱ्यांना आवश्यक ती मदत मिळवून देण्यासाठी जिल्हा प्रशासन प्रयत्नशील असल्याचे जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी स्पष्ट केले.

त्यामुळे केवळ कार्यालयीन अहवालांवर अवलंबून न राहता शेताच्या बांधावर जाऊन परिस्थितीची पाहणी करण्यास सुरुवात झाल्याने शेतकऱ्यांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. या पाहणीप्रसंगी आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी, जिल्हा परिषद सदस्य नेताजीभाऊ खंडागळे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, प्रांताधिकारी सुमित शिंदे, तहसीलदार किरण जमदाडे, तालुका कृषी अधिकारी अवधूत मुळे, तहसीलदार विनायक नगर, तालुका कृषी अधिकारी चंद्रकांत मंगरूळे यांच्यासह महसूल, कृषी व ग्रामविकास विभागाचे अधिकारी उपस्थित होते. तसेच कृषी व पशुसंवर्धन सभापती रामाप्पा चिवडशेट्टी, दक्षिण सोलापूर सभापती संदीप टेळे, उपसभापती वर्षा पटणे, अक्कलकोट पंचायत समिती सभापती रश्मी हिप्परगी, विकास बुळ्ळा, सिद्धाराम शिवमूर्ती, आप्पासाहेब किवडे यांच्यासह जिल्हा परिषद व पंचायत समितीचे पदाधिकारी उपस्थित होते. पावसातील खंड आणि कमी पावसामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत शेतकऱ्यांना दिलासा मिळावा, त्यांच्या अडचणींची योग्य दखल घेतली जावी आणि शासनाच्या निकषांनुसार पात्र लाभार्थ्यांना मदत मिळावी, यासाठी प्रशासनाकडून प्रत्यक्ष परिस्थितीचा आढावा घेतला जात आहे. या पाहणीच्या अहवालावर शासनाकडून कोणती मदत जाहीर होते, याकडे आता शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# कामगारांच्या पाठीशी कायम–आ. राजेंद्र राऊत

बार्शी (कटूसत्य वृत्त):- डॉ. बाबा आढाव यांच्या प्रेरणेतून बार्शीतील हमाल-तोलार कामगारांच्या विविध अडीअडचणी सोडविण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील आहोत. कामगारांच्या प्रश्नांसाठी कायम त्यांच्या पाठीशी राहणार असल्याची ग्वाही आमदार राजेंद्र राऊत यांनी दिली. बार्शी येथे हमाल-तोलार कामगारांचा जिल्हा मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी आमदार राऊत बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळाचे सरचिटणीस सुभाष लोमटे होते. आमदार राऊत म्हणाले, मुळात माझे वडील राष्ट्रसेवादलाचे होते. ते डॉ. बाबा आढाव आणि पन्नालाल सुराणा यांचे मित्र होते. त्यामुळे त्यांच्या विचारांचा वारसा आम्हाला मिळाला आहे. डॉ. बाबा आढाव





यांच्या प्रेरणेतूनच हमाल कामगारांच्या प्रश्नांकडे पाहत आलो असून, त्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी यापुढेही कायम पाठीशी राहणार आहे. बार्शीतील हमाल कामगारांच्या घरकुलाचा प्रश्न सोडविण्यासाठी सहा एकर जमीन उपलब्ध करून देण्यात आली आहे. या जागेचे भूमिपूजन महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळाचे अध्यक्ष स्वर्गीय डॉ. बाबा आढाव यांच्या हस्ते करण्यात आले होते. मात्र, काही तांत्रिक अडचणींमुळे या जागेचा प्रश्न प्रलंबित आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याशी चर्चा करून लवकरच हमाल कामगारांच्या घरकुलाचा प्रश्न मार्गी लावण्यात येईल, असे आमदार राऊत यांनी सांगितले. महामंडळाचे काही पदाधिकारी तसेच आपण स्वतः कॅबिनेट बैठकीदरम्यान मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन हा प्रश्न सोडविण्यासाठी पाठपुरावा करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळाचे उपाध्यक्ष राजकुमार घायाळ यांनी शासकीय धान्य गोदामातील कामगारांचे काम जाऊ नये, यासाठी शासनस्तरावर प्रयत्न करण्याची मागणी केली. महामंडळाचे सरचिटणीस सुभाष लोमटे यांनी महाराष्ट्रासह देशातील हमाल कामगारांच्या विविध प्रश्नांबाबत सध्याच्या सरकारवर नाराजी व्यक्त केली. यावेळी महामंडळाचे सहचिटणीस आप्पा खताळ, संघटक गोरख मेंगडे, बाजार समितीचे सभापती विजय गरड यांनी मनोगत व्यक्त केले. जिल्हाध्यक्ष शिवाजीराव शिंदे यांनी प्रास्ताविक केले. मेळाव्यास जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य, बाजार समितीचे सर्व संचालक, सचिव तुकाराम जगदाळे, महामंडळाचे खजिनदार हुसेन पठाण यांच्यासह हमाल-तोलार कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# घरफोडी करणारी टोळी अकलूज पोलिसांच्या जाळ्यात



**यांचे मार्गदर्शनाखाली झाली कारवाई**

अतुल कुलकर्णी पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण, विजय कबाडे अप्पर पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण, प्रेरणा कट्टे अप्पर पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण पंढरपूर विभाग, संतोष वाळके उपविभागीय पोलीस अधिकारी अकलूज उपविभाग अकलूज,नीरज उबाळे पोलीस निरीक्षक अकलूज तर धडाकेबाज कामगिरी करणारे पोलीस उपनिरीक्षक विशाल कदम, पोलीस हेड कॉन्स्टेबल विनोद साठे, शिवकुमार मदभावी, राहुल रणनवरे, तुषार (बबलु ) गाडे, दत्तात्रय खरात, अनुराधा अडगळे, पोलीस कॉन्स्टेबल सोमनाथ माने,पंडित गवळे, तुकाराम माने-देशमुख, विजय तवटे, सायबर पोलीस ठाणे कडील अजित सुरवसे व स्वप्निल जाधव

अकलूज(कटूसत्य वृत्त):- अकलूज पोलीस ठाणे कडील गुन्हे प्रकटीकरणाने, धडाकेबाज कामगिरी करत,घरफोडी करणाऱ्या सराईत टोळीचा पर्दाफाश करत, ३ आरोपींना अटक केली व त्यांच्याकडून १०,९२२२० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.यामुळे अकलूज पोलिसांचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे. अकलूज पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक ०८/०८/२०२६ ते ०९/०८/२०२६ दरम्यान इनामदारवस्ती, नेवरे (ता.माळशिरस) येथील फिर्यादी जितेन्द्र जयंतराव इनामदार यांच्या बंद घराचे कडीकोयंडा तोडून, अज्ञात चोरांनी घरातील १० ५०,००० किंमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेले होते. याबाबत अकलूज पोलीस ठाणेस गु.र.नं. ५४३/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ३०५ (अ), ३३१(३), ३३१(४)) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याचे तपासामध्ये अकलूज पोलीस ठाणेकडील गुन्हे प्रकटीकरण पथकाने सीसीटिव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण, डम्प डेटा, सीडीआर नालिसीस व गोपनीय बातमीदारांच्या मदतीने संशयितांचा शोध घेतला असता. संशयित आरोपी सागर दिलखुश काळे वय ३६ वर्षे, रा. जळोळी, ता. पंढरपूर, जि. सोलापूर यास ताब्यात घेऊन, त्याचेकडे गुन्हा अनुषंगाने चौकशी केली असता, त्याने त्याचे साथीदार आरोपी आकाश उर्फ पप्पण्या संभाजी चव्हाण वय ३५ वर्ष, व सुरज उर्फ दम्या रवी चव्हाण वय २४ वर्षे, दोघे सध्या रा. पडसतळ, सांगवी,

ता. पंढरपूर, मूळ रा. बादलकोट ता. पंढरपूर यांचे मदतीने नेवरे, यशवंतनगर व स्वरूपनगर परिसरात घरफोडी केल्याची कबुली दिली आहे व चोरी केलेले सोन्याचे दागिने करकंब ता. माळशिरस येथील सोनार 'श्रीराम गोल्ड व सिल्व्हर पॅलेस' चे मालक शिवराज दीपक गोडसे रा. करकंब, ता. पंढरपूर याला विकल्याचे तपासामध्ये निष्पन्न झाल्याने सदर सोनाराकडून एकूण ९,८२,२२०/- रूपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील फरार आरोपी आकाश चव्हाण व सुरज चव्हाण हे त्यांचे राहते घरी असल्याची माहिती मिळाल्याने सदर ठिकाणी गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलीस अधिकारी व अंमलदार हे गेले असता आरोपीस पोलीसांची चाहूल लागताच पळून जात होते. त्यावेळी त्यांना पाठलाग करून शिताफीने ताब्यात घेण्यात आलेले असून, त्यांचा गुन्ह्यात सहभाग निष्पन्न झाल्याने त्यांना दिनांक ११/०९/२०२६ रोजी गुन्ह्यात अटक करून न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्यांना दिनांक १५/०९/२०२६ रोजी पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोसई विशाल कदम हे करीत आहेत. तसेच अकलूज पोलीस ठाणे गु.र.नं. ५७७/२०२६ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३ (२) प्रमाणे दाखल गुन्ह्यामध्ये अकलूज नवीन बस स्थानक येथे फिर्यादी हे बसमध्ये चढत असताना अज्ञात चोरट्याने, त्यांचे बॅगेतून पर्स काढून घेऊन, त्यामध्ये असलेले १) ९०,०००/- रूपये १६ ग्रॅम वजनाचा सोन्याचा लक्ष्मीहार, २) २०,०००/- रूपये ०३ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी व ३) ५,०००/- रूपये रोख रक्कम असा एकूण १,१५,०००/- रूपये किंमतीचा मुद्देमाल चोरी केलेबाबत गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याचे तपासामध्ये अकलूज पोलीस ठाणेकडील गुन्हे प्रकटीकरण पथकाने सीसीटिव्ही फुटेज, तांत्रिक तांत्रिक विश्लेषण, गोपनीय बातमीदारांच्या मदतीने संशयितांचा शोध घेतला. संशयित विधीसंघर्षग्रस्त बालकाने सदरचा गुन्हा केल्याचे निष्पन्न झालेले आहे. त्यामुळे त्यास ताब्यात घेऊन त्याचेकडे गुन्हा अनुषंगाने चौकशी केली असता त्याने गुन्हा केल्याची कबुली दिली असून गुन्ह्यातील चोरी केलेला मुद्देमाल एकूण १.१०,०००/- रूपये किंमतीचे सोन्याचे दागिणे विधीसंघर्षग्रस्त बालकाचे वडीलांनी तपासाकामी हजर केल्याने ते हस्तगत करण्यात आलेले आहेत.

## भूमी संपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम ११(१) नुसार अधिसुचना

क्रं./एलएक्यु/एसआर/दहिवली/०१/२०२६
उपविभागीय अधिकारी कार्यालय माढा विभाग, कुर्डुवाडी
दि.०२/०९/२०२६

ज्या अर्थी, महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागाची अधिसूचना क्र. मिस-११/२०१४/ सी.आर.७७(पार्ट-२)/ए-२ दि. ११ सप्टेंबर २०१५ (यास यापुढे सदर अधिसुचना असे संबोधले जाईल) भूमी संपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा वापार करुन असेल अधिसुचीत केले आहे की सदर अधिनियमाच्या कलम ३ ( झ अ) अन्वये सार्वजनिक जमिनीच्या संपादनाबाबत १०,००० हेक्टर क्षेत्राच्या मर्यादेपर्यत भूसंपादना संबंधात, अशा जिल्हयाचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, **''समुचित शासन''** असल्याचे मानण्यात येईल.

त्या अर्थी, सदर अधिसुचने अन्वये जिल्हाधिकारी, सोलापूर हे समुचित शासन आहे. त्या अर्थी, परिशिष्ट १ मध्ये नमूद जमिन ही सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादित करण्याची आवश्यकता आहे. किंवा आवश्यकता भासू शकते तसेच सार्वजनिक प्रयोजनाबाबतचे निवेदन परिशिष्ट २ मध्ये करण्यात आले आहे. त्या अर्थी सदर कायद्याचा कलम ११ उपकलम (१) अन्वये अधिसुचीत करण्यात येते की, सार्वजनिक प्रयोजनासाठी सदर जमिन संपादनाची आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासू शकते.

त्या अर्थी, परिशिष्ट ३ मध्ये भूसंपादनामुळे विस्थापित कुटूंबासाठी प्रस्तावित जमिन संपादनाची माहिती विनिर्दिष्ट करण्यात आली आहे.

आणि त्या अर्थी, परिशिष्ट ४ मध्ये समाजिक आघात निर्धारणाबाबतची संक्षिप्त माहिती विनिर्दिष्ट करण्यात आली आहे.

आणि त्या अर्थी, परिशिष्ट ५ मध्ये सदर कायद्याच्या कलम ४३ उपकलम (१) अन्वये कामकाज पार पाडणाऱ्या प्रशासकाचा तपशिल देण्यात आला आहे.

त्या अर्थी, सदर कायदद्याच्या कलम ११ उपकलम ४ अन्वये असे जाहिर करण्यात येते की, सदरची अधिसुचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून सदर कायद्याच्या प्रकरण ४ मधील कार्यवाही पूर्ण होईल अशा वेळेपर्यत कोणतीही व्यक्ती, प्राथमिक अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जमिनीचा कोणताही व्यवहार/हस्तांतर करणार नाही किंवा अशा जमिनीवर कोणताही बोजा निर्माण करणार नाही.

परंतु जिल्हाधिकारी अशा प्रकारे अधिसुचित केलेल्या जमिनीच्या मालकाने अर्ज केल्यावर लेखी नोंदवावयाच्या विशेष परिस्थितीमध्ये या पोटकलमाच्या अंमलबजावणीतून अशा जमिन मालकास सूट देऊ शकेल परंतु आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीने, या तरतूदीचे जाणीवपुर्वक उल्लंघन केल्यामुळे तिला सोसाव्या लागलेल्या कोणत्याही नुकसानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्याद्वारे भरपाई करण्यात येणार नाही.

सदर कायद्याच्या कलम ११ चे उपकलम ५ व भूमी संपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २००४ चे कलम ५० उपकलम ३ अन्वये जिल्हाधिकारी विहित करण्यात येईल त्याप्रमाणे भूमी अभिलेख अद्यावत करण्याचे काम हाती घेईल.

आणि ज्या अर्थी, सदर कायद्याचे कलम ३ उपकलम (ग) अन्वये जिल्हाधिकारी, सोलापूर हे समुचित शासन असल्याने **उपविभागीय अधिकारी, माढा विभाग कुर्डुवाडी** यांना जिल्हाधिकारी यांचे वतीने कामे पार पाडण्यासाठी प्राधिकृत करीत आहे.

**परिशिष्ट १**
**जमिनीचे वर्णन**

गावाचे नाव :- दहिवली तालुका :- माढा जि. सोलापूर

| अ.क्रं. | गट नं. | क्षेत्र (हे - आर ) | अ.क्रं. | गट नं. | क्षेत्र (हे - आर ) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २७८ पैकी | ०.२७ | २ | २७९ पैकी | ०.१३ |
| ३ | २६१ पैकी | ०.२८ | ४ | २७० पैकी | ०.०७ |
| ५ | २६९ पैकी | ०.०७ | ६ | २६८ पैकी | ०.०६ |
| ७ | २५७ पैकी | ०.१५ | ८ | २५६ पैकी | ०.५५ |
| ९ | २४३ पैकी | ०.४६ | १० | २४८ पैकी | ०.०२ |
| ११ | २५५ पैकी | ०.२६ | १२ | २५३ पैकी | ०.११ |
| | | | | एकूण | २.४३ |

**परिशिष्ट २**

**प्रकल्पाचे नाव :-** सीना-माढा उपसा सिंचन योजना दहिवली लघुवितरीका सा.क्रं. ०/००० ते १/६३० करिता मौजे - दहिवली ता. माढा जि.सोलापूर

**प्रकल्पाचे विवरण :-** सीना-माढा उपसा सिंचन योजना दहिवली लघुवितरीका सा.क्रं.०/००० ते १/६३० करिता मौजे - दहिवली ता. माढा जि.सोलापूर

**सामाजिक फायदे :-** जलसिंचन (सामाजिक, आर्थिक व इतर फायदे)

**परिशिष्ट ३**
**पुनर्वसन विषयक बाबीचे विवरण**

गावाचे नाव :- दहिवली तालुका :- माढा जि. सोलापूर

| अ.क्रं. | स.नं/गट नं. | क्षेत्र (हे - आर ) |
|---|---|---|
| | लागू नाही. | - |

**परिशिष्ट ४**
**सामाजिक आघात निर्धारण अहवालाचा गोषवारा**
**अनुसूची-चार**

( सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अधिकाऱ्याने दिलेला ) मा. अवर सचिव, महाराष्ट्र शसन यांचेकडील क्रमांक संकीर्ण-२०२५ प्र.क्र.४७/अ-३, दिनांक १६ सप्टेंबर २०२५ अन्वये सदर प्रकल्पाचे काम संपादन मडंळाने ताबा घेऊन पूर्ण झाले असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे प्रकल्प पूर्ण झाला असल्याने विधी व न्याय विभागाने अन्य प्रकरणी दिलेल्या अभिप्रायानुसार भूसंपादन अधिनियम, २०१३ मधील कलम १० (क) नुसार सदर प्रस्तावास पूर्वलक्षी प्रभावाने SIA सूट देता येऊ शकत नाही.

**परिशिष्ट ५**
**प्रशासक नियुक्तीचे विवरण**

**१) प्रशासकाचे पदनाम :-** लागू नाही.
**२) प्रशासकाचा कार्यालयीन पत्ता :-** लागू नाही.
**३) ज्या अधिसुचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती केली ते नमूद करावे :-** लागू नाही.

सदर अधिसुचनेद्वारे ज्या जमिनीची सार्वजनिक प्रयोजनाची आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासण्याचा संभव असल्याचे कायद्याच्या कलम ११ चे उपकलम १ खाली अधिसुचित करण्यात आले आहे. प्रारंभिक अधिसुचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसाच्या आत उपविभागीय अधिकारी, माढा विभाग कुर्डुवाडी यांचे कार्यालयात आक्षेप नोंदविता येईल.

नोट - प्रस्तूत जमिनीचा नकाशा पाहणीसाठी उपविभागीय अधिकारी माढा विभाग, कुर्डुवाडी यांचे कार्यालयात उपलब्ध आहे.

**सही/-**
**(जयश्री आव्हाड)**
**उपविभागीय अधिकारी**
**माढा विभाग कुर्डुवाडी**

**स्थळ:- कुर्डुवाडी**
**दिनांक :- ०२/०९/२०२६**

जिमाका/सो/जाहि/१३१/२०२६-२७

# दुष्काळ पाहणीसाठी संपूर्ण महसूल प्रशासन शेतकऱ्यांच्या बांधावर

सोलापूर(कटूसत्य वृत्त):- एल-निनोच्या पार्श्वभूमीवर सोलापूर जिल्ह्यात निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी दि. १२ व १३ सप्टेंबर रोजी संपूर्ण महसूल प्रशासन शेतकऱ्यांच्या बांधावर उतरले आहे. जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी काल दक्षिण सोलापूर, अक्कलकोट आणि उत्तर सोलापूर तालुक्यातील दुष्काळी गावांची पाहणी करून शेतकऱ्यांशी संवाद साधला होता, तर निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी सांगोला व माळशिरस तालुक्यातील गावांची पाहणी केली.

त्याच अनुषंगाने आज अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी उत्तर सोलापूर व मंगळवेढा तालुक्यातील दुष्काळी गावांना भेटी देऊन पिकांची पाहणी केली व शेतकऱ्यांशी संवाद साधला. अप्पर जिल्हाधिकाऱ्यांकडून उत्तर सोलापूर व मंगळवेढ्यात पाहणी आजच्या पाहणी दौऱ्यात अप्पर जिल्हाधिकारी श्री. निऱ्हाळी यांनी -- बाळे येथे सोयाबीन, उडीद, तूर पिकाची पाहणी केली. पाण्याअभावी पिकांचे मोठे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले. शेतकऱ्यांशी संवाद साधताना ते म्हणाले की, शासनाकडे प्रस्ताव पाठवून शक्य तितकी मदत करण्यात येईल. - भोगाव येथे सोयाबीन पिकाची पाहणी केली. यावेळी सोलापूर शहर उत्तरचे तहसीलदार निलेश पाटील व तालुका कृषी अधिकारी माळी उपस्थित होते.

- देगाव येथे मका पिकावर लष्करी अळीचा प्रादुर्भाव झाल्याने झालेल्या नुकसानीची पाहणी केली.
- माचनूर येथे ई-पीक पाहणी व कांदा पिकाची पाहणी केली. - ब्रह्मपुरी, ता. मंगळवेढा येथे पावसाअभावी पीक न घेतलेल्या चालू पड जमिनीची पाहणी केली.

जिल्हाधिकाऱ्यांचा कालचा दौरा काल दि. १२ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दक्षिण सोलापूर तालुक्यातील बोरामणी, धोत्री तसेच अक्कलकोट तालुक्यातील वळसंग, कोंडाळी, कुरनूर, कुरनूर धरण, नाविंदगी तर उत्तर सोलापूर तालुक्यातील प्रताप नगर आणि भाटेवाडी या गावांना भेटी दिल्या. त्यांनी सोयाबीन, ऊस, मका पिकांची पाहणी करून पेरणी कधी केली, पाऊस कधीपासून नाही, जमिनीत ओल किती आहे, तसेच पिण्याचे पाणी व जनावरांच्या चाऱ्याची स्थिती याबाबत शेतकऱ्यांकडून माहिती घेतली. या पाहणी अहवालाचे संकलन करून प्रांताधिकाऱ्यांमार्फत जिल्हाधिकारी कार्यालयाकडे अहवाल येणार असून, तो तात्काळ शासनाला सादर करण्यात येणार आहे, जेणेकरून शेतकऱ्यांना तात्काळ मदत मिळू शकेल.